# TYBA SEM-V

## Economis (G-3) Indian Economic Development-I

## 1. आर्थिक विकास आणि वृद्धी

## (Economic Development and Growth)

१.१ आर्थिक विकास अर्थ, व्याख्या आणि निर्देशक

१.२ आर्थिक वृद्धी: अर्थ, व्याख्या आणि निर्देशक

१.३ आर्थिक विकासाची आवश्यकता आणि महत्त्व

### ▸ १.० प्रास्ताविक : (Introduction)

आर्थिक विकास ही अर्थव्यवस्थेतील जीवनमान समृद्धी आणि तंत्रज्ञानाची प्रगती यासह उत्पादनाच्या पातळीवरील वाढ होय. आर्थिक विकासाचा संबंध मानवी भांडवलाची वाढ, असमानतेच्या आकडेवारीतील घट आणि लोकसंख्येच्या जीवनाची गुणवत्ता सुधारणाऱ्या संरचनात्मक बदलांशी आहे. आर्थिक वृद्धीशी तुलना करता आर्थिक विकास ही संकल्पना व्यापक आहे. आर्थिक वृद्धी हा आर्थिक विकासाचा एक भाग आहे. आर्थिक विकासासाठी आर्थिक वृद्धी आवश्यक आहे परंतु पुरेशी नाही. आर्थिक वृद्धी म्हणजे देशातील वस्तू व सेवांच्या वास्तव उत्पादनातील वाढ होत होय. वृद्धी ही उपभोग, सरकारी खर्च, गुंतवणूक, निव्वळ निर्यात या स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या घटकांपैकी एका घटकात हळूहळू वाढ होण्याशी संबंधित आहे. आर्थिक वृद्धी हा संख्यात्माक दृष्टीकोन आहे.

प्रस्तुत प्रकरणात आर्थिक विकासाचा अर्थ, व्याख्या व निर्देशक, आर्थिक वृद्धीचा अर्थ, व्याख्या व निर्देशक आणि आर्थिक विकासाची आवश्यकता व महत्त्व याविषयी माहिती दिली आहे.

### ▸ १.१ आर्थिक विकास अर्थ, व्याख्या आणि निर्देशक :

### (Economic Development: Meaning, Definitions and Indicators)

आर्थिक विकासाचा अर्थ, व्याख्या आणि निर्देशक याविषयी माहिती पुढे दिली आहे.

**१.१.१ आर्थिक विकासाचा अर्थ व व्याख्या (Meaning and Definitions of Economic Development):**

आर्थिक विकास म्हणजे देशाच्या सामाजिक-आर्थिक संरचनेत (संस्थात्मक आणि तांत्रिक बदल) प्रगतीशील बदलांसह उत्पन्न, बचत आणि गुंतवणूकीतील बदल होय. आर्थिक विकास ही अर्थव्यवस्थेतील जीवनमान समृद्धी

आणि तंत्रज्ञानाची प्रगती यासह उत्पादनाच्या पातळीवरील वाढ होय. विकासाचा संबंध मानवी भांडवलाची वाढ, असमानतेच्या आकडेवारीतील घट आणि लोकसंख्येच्या जीवनाची गुणवत्ता सुधारणाऱ्या संरचनात्मक बदलांशी आहे.

आर्थिक वृद्धीशी तुलना करता आर्थिक विकास ही संकल्पना व्यापक आहे. आर्थिक वृद्धी हा आर्थिक विकासाचा एक भाग आहे. आर्थिक विकासासाठी आर्थिक वृद्धी आवश्यक आहे परंतु पुरेशी नाहीं. देशातील लोकांच्या राहणीमानाची गुणवत्ता व त्यांचा सर्वांगीण विकास हा आर्थिक विकासाचा आधार आहे. आर्थिक विकास ही दीर्घकालीन प्रक्रिया समजली जाते. आर्थिक विकास संख्यात्मक आणि गुणात्मक असू शकतो. आयुर्मर्यादा दा, बालमृत्यू दर, साक्षरता दर आणि दारिद्र्य दर यातील सुधारणेच्या आधारे आर्थिक विकास मोजला जाऊ शकतो. आर्थिक विकास ही संकल्पना

अल्पविकसित किंवा विकसनशील देशांशी संबंधित आहे. आर्थिक विकासासाठी सरकारी मदतीची, समर्थनाची किंवा हस्तक्षेपाची गरज असते. सरकारने विविध क्षेत्रांच्या विकासासाठी आखलेल्या धोरणाने आर्थिक विकास घडून येण्यास मदत येते. आर्थिक विकास ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे.

आर्थिक विकासाचा अभ्यास ही अर्थशास्त्राची नवीन शाखा आहे. महामंदी आणि दुसऱ्या महायुद्धानंतर ती

प्रसिद्धीस आली. काटेकोरपणे सांगावयाचे झाल्यास, आर्थिक विकासाची नेमाकेपनाने व्याख्या करणे सोपे नाही कारण विकसित आणि अल्पविकसित देशांमध्ये फरक करण्यासाठी वेगवेगळ्या निकषांचा उपयोग केला गेला आहे.

सामान्यपणे दीर्घ कालावधीत वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात शाश्वत वाढ होण्याच्या प्रक्रियेस आर्थिक विकास म्हणतात. विकासाचा दर लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा जास्त असल्यास दरडोई वास्तव उत्पन्न वाढते.

आर्थिक विकास म्हणजे देशाच्या संपत्ती आणि राहणीमानातील वाढ होय. आर्थिक विकास सहसा स्थूल देशांतर्गत उत्पादनात वाढ (जीडीपी) किंवा एकूण उत्पन्नाच्या इतर मापनाद्वारे मोजला जाते. आर्थिक वृद्धीची परिस्थिती निर्माण करण्यासाठी आणि आर्थिक भविष्य सुनिश्चित करण्यासाठी आर्थिक विकास आवश्यक आहे. आर्थिक विकास म्हणजे जीवनशैली आणि राहणीमानात सुधारणा होय.

देशाच्या आर्थिक स्थितीचा विचार करता आर्थिक विकास म्हणजे केवळ संख्यात्मक बदल नाही तर गुणात्मक बदल (आर्थिक संरचना बदलणे, नवीन क्षेत्र आणि उद्योगांचा उदय होणे, नवीन रोजगार इ.) देखील होय. त्यांच्यामुळे सर्व मानवी गरजांचे चांगले व परिपूर्ण समाधान होते.

अमर्त्य सेन यांच्या मते, विकास म्हणजे लोकांसाठी स्वातंत्र्य निर्माण करणे आणि अधिकाधिक स्वातंत्र्यासाठी असलेले अडथळे दूर करणे होय. मोठे स्वातंत्र्य लोकांना त्यांचे स्वतःचे भाग्य निवडण्यास सक्षम करते. स्वातंत्र्याप्त म्हणजेच विकासास असलेल्या अडथळ्यांमध्ये दारिद्र्य, आर्थिक संधींचा अभाव, भ्रष्टाचार, दुर्बल प्रशासन, शिक्षणाचा अभाव आणि आरोग्याचा अभाव यांचा समावेश आहे.

आर्थिक विकास या संकल्पनेच्या पुढे काही व्याख्या दिलेल्या आहेत. त्यावरून आर्थिक विकास या संकल्पनेचा अर्थ अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट होण्यास मदत होईल.

**"प्रा. विल्यमसन यांच्या मते, आर्थिक विकास ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यायोगे देशातील लोक उपलब्ध प्साधनसामग्रीचा अशा प्रकारे वापर करतात की देशाचे दरडोई उत्पन्न वाढते**." (According to Prof. Williamson, Economic Development is a process whereby the people of a country utilize the available resources in such a way that the per capita income of the country increases.)

**"प्रा. हिगिन्स यांच्या मते, आर्थिक विकास म्हणजे एखाद्या देशाच्या दरडोई आणि राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ होय."** (According to Prof. Higgins, Economic Development is the increase in per capita and national income (NI) of a country.)

**"प्रा. आर्थर लेविस यांच्या मते, आर्थिक विकास देशाच्या दरडोई उत्पादन वाढीचे प्रतिनिधित्व करतो."** (According to Prof. rthur Lewis, Economic Development represents the per capita increase in the production of a country.)

**"प्रा. मायर आणि बाल्डविन यांच्या मते, आर्थिक विकास ही एक प्रक्रिया आहे, ज्यायोगे अर्थव्यवस्थेचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न दीर्घ कालावधीत वाढते."** (According to Prof. Meier and Baldwin, Economic Development is a process, whereby, economy's real national income increases over a long period of time.)

ही व्याख्या सोपी तसेच नेमकेपणे दिलेली आहे. ती आर्थिक विकास ही एक 'प्रक्रिया' आहे, प्रक्रियेचा परिणाम 'वास्तव राष्ट्रीय उत्पन्न' वाढण्यात होतो आणि वास्तव उत्पन्न 'दीर्घ कालावधीत' टिकविले जाणे आवश्यक आहे या आर्थिक विकासाच्या तीन मूलभूत वैशिष्ट्यांवर जोर देते. या व्याख्येत, प्रक्रियेचा अर्थ असा आहे की विशिष्ट प्रवाहाच्या कार्यामुळे आर्थिक व्यवस्थेत सतत बदल घडवून येतात. या प्रवाहात मूलभूत घटकांच्या पुरवठ्यात बदल म्हणजेच भांडवल संचय, लोकसख्या वाढ, उत्पादन तंत्रात सुधारणा, कौशल्य आणि इतर संस्थात्मक व संघटनात्मक बदल यांचा समावेश होतो. तसेच उत्पादनांच्या मागणीच्या रचनेत बदल म्हणजेच लोकसंख्येचा आकार आणि रचना, उत्पन्नाची पातळी व वितरण, अभिरुची आणि इतर संस्थात्मक बदलांचाही समावेश होतो. निव्वळ राष्ट्रीय उत्पादन कमी कालावधीसाठी नव्हे तर दीर्घ काळासाठी टिकवणे आवैश्यक आहे. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील दीर्घकाळ वाढीच्या प्रवृत्तीस आर्थिक विकास म्हणतात.

### १.१.२ आर्थिक विकासाचे निर्देशक (Indicators of Economic Development):

जेव्हा एखाद्या देशाचा विकास होत असतो, तेव्हा त्या देशाच्या अर्थव्यवस्थेत बदल घडतात. हे बदल आर्थिक विकासाचे निर्देशक म्हणून ओळखले जातात. आर्थिक विकासाचे प्रमाण मोजण्यासाठी जी मापने किंवा निकष वापरले जातात त्यांना आर्थिक विकासाचे निर्देशक म्हणतात. विकास ही एक गतिशील संकल्पना असल्याने त्याचे निर्देशकही बदलू शकतात. त्यामुळे आर्थिक विकासाच्या निर्देशकाच्या संदर्भात वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांची वेगवेगळी मते आहेत.

### आर्थिक विकासाचे निर्देशक

१) स्थूल राष्ट्रीय उत्पादन

२) दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पादन

३) जीवनाची भौतिक गुणवत्ता निर्देशांक

४) मूलभूत मानवी गरजा

५) श्रमदलाची व्यवसाय रचना

६) नागरीकरण

७) दरडोई उपभोग

८) औद्योगीकरणात वाढ

### १) स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GNP) :

स्थूल राष्ट्रीय उत्पादन हा आर्थिक विकासाचा निर्देशक समजला जातो. दीर्घ कालावधीत एखाद्या देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात सातत्याने वाढ होत असेल तर आर्थिक विकास होतो. जर स्थूल राष्ट्रीय उत्पादन अधिक असेल तर आर्थिक विकास अधिक असतो आणि याउलट स्थूल राष्ट्रीय उत्पादन कमी असेल तर आर्थिक विकास कमी असतो. बाल्डविन, सायमन कुझनेट्स, मेयर इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी स्थूल राष्ट्रीय उत्पादनाला आर्थिक विकासाचा निर्देशक मानले आहे.

### २) दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Per Capita GNP):

दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पादन हा आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात लोकसंख्या वाढीपेक्षा अधिक वेगाने वाढ होत असेल तर दरडोई उत्पन्नात वाढ होते. मायर, पॉल बॅरन, बुकानन आणि एलिस या अर्थशास्त्रज्ञांनी दरडोई उत्पन्नातील वाढीस आर्थिक विकासाचा निर्देशक म्हणून स्वीकारले आहे.

### ३) जीवनाची भौतिक गुणवत्ता निर्देशांक :

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत देशातील लोकांच्या राहणीमान पातळीत वाढ होणे अपेक्षित असते, जीवनाची भौतिक गुणवत्ता निर्देशांक (Physical quality of life index -PQLI) हा आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. जीवनाची भौतिक गुणवत्ता निर्देशांक हा निकष मॉरिस यांनी विकसित केला आहे. यात तीन घटक असतात. आयुर्मर्यादा, बालमृत्यू दर आणि साक्षरता दर हे ते तीन घटक आहेत. या घटकांची पातळी आर्थिक विकासाची पातळी निश्चित करते. जर लोक जास्त आयुष्य जगत असतील आणि साक्षर असतील तर जीवनाची भौतिक गुणवत्ता निर्देशांकाचे मूल्य जास्त असेल तर तेथे आर्थिक विकास घडून येतो.

### ४) मूलभूत मानवी गरजा :

मूलभूत मानवी गरजांची पूर्तता हा आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. या निर्देशकानुसार आरोग्य, शिक्षण, पाणी, अन्न, वस्त्र, निवारा अशा लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याच्या आधारे विकासाचे मूल्यांकन

केले जाते. जर लोकांच्या या मूलभूत गरजा पूर्ण होत असतील तर आर्थिक होत आहे आणि जर लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नसतील तर आर्थिक होत नाही असे म्हणता येईल.

### ५) श्रमदलाची व्यवसाय रचना :

श्रमदलाच्या व्यवसाय रचनेतील बदल हाही आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. देशाचा आर्थिक विकास होत जातो तसतसे प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी होऊन दुय्यम व तृतीय क्षेत्रांवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढत जाते. देशात असे घडून येत असेल तर आर्थिक विकास होत आहे असे मानता येते.

### ६) नागरीकरण :

नागरीकरण किंवा शहरीकरण हाही आर्थिक विकासाचा एक निर्देशक आहे. नागरीकरण किंवा शहरीकरणात वाढ होत असेल तर देशाचा विकास होत आहे असे मानले जाते. देशात औद्योगीकरण वेगाने होते तेव्हा शहरी भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढत जाते.

### ७) दरडोई उपभोग :

दरडोई उपभोग हा एक विकासाचा निर्देशक आहे. देशाचा जसजसा विकास होतो तसतसे देशातील वस्तू व सेवांच्या उत्पादनात वाढ होते. त्यामुळे लोकांना अधिकाधिक वस्तू व सेवांचा उपभोग घेणे शक्य होते. त्यामुळे दरडोई उपभोग वाढत असेल तर आर्थिक विकास होत आहे असे मानता येते.

### ८) औद्योगीकरणात वाढ :

औद्योगीकरणात वाढ हाही एक आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. देशात वेगाने औद्योगीकरण घडून येत असेल तर देशातील उत्पादन व रोजगारात वाढ होते. त्यामुळे लोकांच्या आणि देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. दरडोई उत्पन्नात वाढ होते. देशात औद्योगीकरणाचा वेग वाढला की देशाचा वेगाने विकास घडून येतो.

## ▸ १.२ आर्थिक वृद्धी अर्थ, व्याख्या आणि निर्देशक : (Economic Growth: Meaning, Definitions and Indicators)

आर्थिक वृद्धीचा अर्थ, व्याख्या आणि निर्देशक याविषयी माहिती पुढे दिली आहे.

### १.२.१ आर्थिक वृद्धीचा अर्थ व व्याख्या (Meaning and Definitions of Economic Growth):

आर्थिक वृद्धी म्हणजे देशातील वस्तू व सेवांच्या वास्तव उत्पादनातील वाढ होत होय. वृद्धी ही उपभोग, सरकारी खर्च, गुंतवणूक, निव्वळ निर्यात या स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या घटकांपैकी एका घटकात हळूहळू वाढ होण्याशी संबंधित आहे. आर्थिक वृद्धी ही देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा (जीडीपी) विस्तार दर्शविते. आर्थिक विकासाच्या तुलनेत आर्थिक वृद्धी ही संकुचित संकल्पना आहे. आर्थिक वृद्धी ही संकल्पना मुळात विकसित देशांशी संबंधित आहे. आर्थिक वृद्धी हा संख्यात्माक दृष्टीकोन आहे. स्थूल देशांतर्गत, दरडोई उत्पन्न इत्यादींतील वाढीद्वारे आर्थिक वृद्धी मोजली जाऊ शकते.

**"दीर्घकाळात अर्थव्यवस्थेच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात सातत्यपूर्ण रीतीने वार्षिक वाढ होणे म्हणजे अधिक वृद्धी होय."**

(Economic growth is defined as a sustained annual increases in an economy's real national income over a long period of time.) दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास आर्थिक वृद्धी म्हणजे स्थिर किमतीला निव्वळ राष्ट्रीय उत्पादनातील वाढीची प्रवृत्ती होय.

आर्थिक वृद्धीची ही व्याख्या अपूर्ण व असमाधानकारक असल्याची टीका काही अर्थशास्त्रज्ञांनी केली. त्यांच्या

मते, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली तरी लोकांच्या राहणीमानाच्या पातळीत घट होऊ शकते. जेव्हा राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीपेक्षा लोकसंख्येत अधिक वेगाने वाढ होते तेव्हा असे घडते. याचे कारण अशा स्थितीत दरडोई उत्पन्नात घट होते. जेव्हा राष्ट्रीय उत्पन्नात लोकसंख्या वाढीपेक्षा अधिक वेगाने वाढ होईल तेव्हाच दरडोई उत्पन्नात वाढ होते.

आर्थिक वृद्धीची दुसऱ्या प्रकारे करण्यात आलेली व्याख्या दरडोई उत्पन्नाच्या संदर्भात केली जाते. या दुसऱ्या दृष्टिकोनानुसार -

**"दीर्घकाल देशाच्या वास्तव दरडोई उत्पन्नात वार्षिक वाढ होणे म्हणजे आर्थिक वृद्धी होय."**

(Economic growth means the annual increase in real per capita income of a country over the long period.)

**आर्थर लेविस असे म्हणतात की, "आर्थिक वृद्धी म्हणजे दरडोई लोकसंख्येमागे उत्पादन वाढ होणे होय."**

(Arther Lewis says that, "economic growth means the growth of output per head population.")

लोकांच्या राहणीमानाच्या पातळीत वाढ घडवून आणणे हे आर्थिक वृद्धीचे प्रमुख ध्येय आहे. त्यामुळे दुसऱ्या प्रकारे आर्थिक वृद्धीची दिलेली व्याख्या जी दरडोई उत्पन्न किंवा उत्पादनाच्या संदर्भात दिलेली आहे ती अधिक चांगली आहे.

आर्थिक वृद्धीच्या संदर्भात आणखी एक मुद्दा महत्त्वाचा आहे तो म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नातील बाढ किंवा अधिक योग्य प्रकारे सांगावयाचे झाल्यास दरडोई उत्पन्नातील वाढ ही सातत्यपूर्ण वाढ (sustained increase) असलीच 15 पाहिजे. दरडोई उत्पन्नातील सातत्यपूर्ण वाढ म्हणजे दीर्घ कालावधीत दरडोई उत्पन्नातील वाढीची प्रवृत्ती होय. अल्पकाळात दरडोई उत्पन्नात वाढ झाली, तर त्यास आर्थिक वृद्धी म्हणता येणार नाही. व्यापार चक्रात असे होत असते. जेव्हा सातत्याने फार मोठा काळ दरडोई उत्पन्नात वाढ होते तेव्हा त्यास आर्थिक वृद्धी म्हणता येते.

अनेक अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास या संज्ञात फरक करताना आर्थिक वृद्धीचा अर्थ स्पष्ट केला आहे.

शंपीटर यांच्या मते,

**"आर्थिक वृद्धी म्हणजे दीर्घकालात स्थिर व क्रमाक्रमाने बदल घडून येणे असून, ते बचती व भांडवलाच्या दरात उत्तरोत्तर झालेल्या वाढीमुळे होतात."**

("Growth is a gradual and steady change in the long run which comes about by a gradual increase in the rate of savings and population." - Schumpeter)

## १.२.२ आर्थिक वृद्धीचे निर्देशक (Indicators of Economic Growth):

आर्थिक वृद्धीचे निर्देशक पुढीलप्रमाणे :

***आर्थिक वृद्धीचे निर्देशक:***

१) दरडोई उत्पादन आणि लोकसंख्या वाढीचे उच्च वृद्धी

२) उत्पादकतेतील बाढ

३) रचनात्मक परिवर्तनाचा उच्च दर

४) शहरीकरण

५) विकसित देशांचा वरच्या दिशेने विस्तार

६) मानव, वस्तू व भांडवल यांचे आंतरराष्ट्रीय प्रवाह

### १) दरडोई उत्पादन आणि लोकसंख्या वाढीचे उच्च वृद्धी दर (High Rates of Growth of Per Capital Product and Population):

आधुनिक काळातील आर्थिक वृद्धीचा एक महत्त्वाचा निर्देशक दरडोई उत्पादन आणि लोकसंख्या वाढीचे उच्च दर हा आहे. अठराव्या शतकाच्या शेवटी व एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील विकसित देशांच्या बाबतीत दरडोई उत्पादनातील वाढ व त्याबरोबरच लोकसंख्या वाढीचा मोठा दर हे अनुभवास आले. आधुनिक आर्थिक वृद्धी म्हणजे दरडोई उत्पादन व लोकसंख्येतील वाढ होय. मात्र, यातून लोकसंख्या वाढ ही दरडोई उत्पादन वाढीसाठी आवश्यक अट आहे हे सूचित होत नाही. दराडोई उत्पादन आणि लोकसंख्या वाढीचे उच्च वृद्धी दर एकूण उत्पादनातील वाढीचे उच्च दर सूचित करतात.

### २) उत्पादकतेतील वाढ (Rise in Productivity):

दरडोई उत्पादनातील वाढ हा आधुनिक आर्थिक वृद्धीचा निर्देशक आहे. दरडोई उत्पादनातील वाढ ही प्रामुख्याने

आदानाच्या गुणवत्तेत सुधारणा झाल्यामुळे व आदानांच्या उत्पादकतेत झालेल्या वाढीमुळे घडून येते. श्रम आणि भांडवलाच्या साधनसामग्रीत वाढ किंवा कार्यक्षमतेत वाढ किंवा दोन्हीमुळे दरडोई उत्पादनात वाढ होते. कार्यक्षमतेतील वाढ ही आदानाच्या प्रति एककामागे अधिक उत्पादन सूचित करते. कुझनेटस् यांच्या मते, विकसित देशात दरडोई उत्पादनात वाढ होण्यासाठी आवश्यक एवढ्या प्रमाणात उत्पादकता वाढीचा दर असलेला दिसून येतो. लोकसंख्या वाढ व त्यामुळे श्रमदलात झालेल्या वाढीमुळे राष्ट्रीय उत्पादनात वाढ होते. मात्र, विकसित देशांच्या आर्थिक वृद्धीत दरडोई मानवी तासात दीर्घकालीन घट झालेली दिसते.

### ३) रचनात्मक परिवर्तनाचा उच्च दर (High Rate of Structural Transformation):

रचनात्मक परिवर्तनाचा उच्च दर हा आर्थिक वृद्धीचा आणखी एक निर्देशक आहे. आधुनिक आर्थिक वृद्धीतील

रचनात्मक परिवर्तनात शेती कार्याकडून बिगर शेती कार्याकडे स्थानांतर, उद्योगांकडून सेवांकडे स्थानांतर, उत्पादक घटकांच्या प्रमाणात बदल, श्रमाच्या व्यावसायिक दर्जात बदल वगैरे बाबींचा समावेश होतो. आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत एकूण उत्पादनातील शेती क्षेत्राचा वाटा ऑस्ट्रेलिया वगळता इतर देशात कमी झाला.

एका बाजूला एकूण उत्पादनातील शेतीचा वाटा कमी झाला, तर दुसऱ्या बाजूला औद्योगिक क्षेत्राचा वाटा ५० मोठ्या प्रमाणावरील रचनात्मक परिवर्तन तीन क्षेत्रातील श्रमदलाच्या विभागणीच्या आधारे स्पष्ट होते. आर्थिक वृद्धीच्या मोठ्या काळात शेती क्षेत्रातील श्रमिकांच्या संख्येत घट होऊन औद्योगिक क्षेत्रातील श्रमिकांच्या संख्येत वाढ झालेली आढळून येते.

### ४) शहरीकरण (Urbanisation):

विकसित देशात ग्रामीण भागातून शहरी भागाकडे लोकसंख्येचा फार मोठा भाग जाणे हा आधुनिक आर्थिक वृद्धीचा निर्देशक आहे. विकसित देशातील मोठ्या प्रमाणातील शहरीकरण हे औद्योगिकरणामुळे झालेले आहे शहरीकरणामुळे जनन दरात घट झाली. छोट्या कुटुंबाचे प्रमाण वाढले, शहरीकरणामुळे विकसित देशातील उपभोग खर्चाची पातळी व रचना यावर प्रभाव पडला. शहरीकरणामुळे वाढत्या प्रमाणातील गरजा पूर्ण करणे अधिक खर्चीक बनले. प्रदर्शन परिणामामुळे उपभोग रचनेत बदल होऊन उपभोग खर्चात वाढ झाली.

### ५) विकसित देशांचा बरच्या दिशेने विस्तार (The Outward Expansion of Developed Countries):

विकसित देशांची वृद्धी ही असमान प्रमाणात आहे. काही देशांत आर्थिक वृद्धी लवकर घडून आली, तर काही देशांत ती उशिरा घडून आली. सुरुवातीस इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली व ती पुढे इतर युरोपीय देशात पसरली. वाहतूक व दळणवळण यातील तंत्रज्ञानविषयक क्रांतीमुळे विकसित देशांचा वरच्या दिशेने विस्तार घडून आला. त्यातून वसाहतींवरील प्रत्यक्ष राजकीय वर्चस्व वाढले. आंतरराष्ट्रीय संबंधातील राजकीय किंवा सत्ता हा घटक आधुनिक आर्थिक वृद्धीच्या प्रसारास जबाबदार ठरलेला महत्त्वाचा घटक आहे. विकसित देशांतील मोठ्या गटाची भाषा समान असल्याने ज्ञानाची व तंत्राची देवाण घेवाण शक्य झाली.

आधुनिक आर्थिक वृद्धी अल्पविकसित देशात पसरली नाही. अशा देशात स्थिर व लवचीक अशा राजकीय

व सामाजिक चौकटीचा असलेला अभाव आणि विकसित देशांनी अवलंबिलेले वसाहतवादी धोरण यामुळे

अल्पविकसित देशात आर्थिक वृद्धी घडून आली नाही.

### ६) मानव, वस्तू व भांडवल यांचे आंतरराष्ट्रीय प्रवाह (International Flows of Men, Goods & Capital):

आंतरराष्ट्रीय पातळीवर मानव, वस्तू व भांडवल यांच्या प्रवाहात वाढ झाली. वाहतुकीच्या साधनातील प्रगतीमुळे आंतरराष्ट्रीय स्थलांतरात वाढ झाली. जागतिक व्यापारात वाढ झाली. परकीय व्यापाराच्या वाढीस बस्तूच्या वाहतुकीतील क्रांती, व्यापारावरील निबंध शिथिल करणे यासारखे घटक जबाबदार असल्याचे प्रा. कुझनेटल यांनी स्पष्ट केले आहे. परकीय भांडवल गुंतवणुकीच्या आंतरराष्ट्रीय प्रवाहातही वाढ झाली.

### १.३ आर्थिक विकासाची आवश्यकता आणि महत्त्व : (Need and Importance of Economic Development)

आर्थिक विकासाचा संबंध कमी विकसित देशांशी आहे. अशा देशातील दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता अशा विविध समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आणि जनतेला उच्च राहणीमानाची पातळी मिळवून देण्यासाठी आर्थिक आवश्यक व महत्त्वाचा असतो. आर्थिक विकासाची आवश्यकता आणि महत्त्व पुढीलप्रमाणे :

### आर्थिक विकासाची आवश्यकता आणि महत्त्व :

१) उत्पादन वाढ

२) उत्पादकता वाढ

३) नैसर्गिक साधनसामग्रीचा पर्याप्त वापर

४) प्राथमिक क्षेत्रावरील अवलंबित्व कमी

५) रोजगार संधीत वाढ

६) दारिद्र्य निर्मुलन

७) आर्थिक विषमतेत घट

८) राहणीमानात सुधारणा

९) आर्थिक स्वावलंबन

१०) आर्थिक वृद्धी

**१) उत्पादन वाढ :**

देशात शेती, उद्योग व सेवा क्षेत्रात उत्पादन वाढ होण्यासाठी आर्थिक विकास आवश्यक आणि महत्त्वाचा असतो. देशाचा आर्थिक विकास घडून येत असताना शेती, उद्योग व सेवा क्षेत्रात उत्पादन वाढ होते. त्यामुळे देशातील वस्तू व सेवांच्या उपलब्धतेत वाढ होते.

**२) उत्पादकता वाढ :**

उत्पादन घटकांच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी आर्थिक विकास महत्त्वाचा असतो. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आधुनिक उत्पादन पद्धतीचा वापर केला जाऊन देशातील उत्पादकतेत वाढ होते.

**(३) नैसर्गिक साधनसामग्रीचा पर्याप्त वापर :**

नैसर्गिक साधनसामग्रीचा पर्याप्त वापर होण्यासाठी आर्थिक आर्थिक विकास महत्त्वाचा असतो. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत नैसर्गिक साधनसामग्रीचा अधिकाधिक वापर करूनु, उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला जातो.

**४) प्राथमिक क्षेत्रावरील अवलंबित्व कमी :**

देशाचे प्राथमिक क्षेत्रावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आर्थिक विकास महत्त्वाचा असतो. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत राष्ट्रीय उत्पन्नातील उद्योग व सेवा क्षेत्राच्या वाट्यात वाढ होऊन शेती क्षेत्राचा वाटा कमी होतो.

**५) रोजगार संधीत वाढ :**

अल्पविकसित देशात बेकारीचे प्रमाण मोठे असते. देशातील रोजगार संधीत वाढ करून बेकारीचे प्रमाण कमी करण्यासाठी आर्थिक विकास आवश्यक व महत्त्वाचा असतो. आर्थिक विकास प्रक्रियेत औद्योगिकरणाचा वेग वाढून रोजगार संधीत वाढ घडून येते.

**६) दारिद्र्य निर्मुलन :**

सात्यविकसित देशात दारिद्रयाचे प्रमाण मोठे असते. लोकांच्या उत्पन्नात वाढ करून दारिद्याचे प्रमाण क असल्यासाठी आर्थिक विकास महत्वाचा आहे. आर्थिक विकासामुळे रोजगार संधीत वाढ होते. तसेच लोकांना कुयन मिळण्याच्या अधिक संधी उपलब्ध होतात. त्यातून दारिद्रय रेषेखालील लोकांच्या प्रमाणात घट होते.

**७) आर्थिक विषमतेत घट :**

देशातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी आर्थिक विकास महत्त्वाचा आहे. अल्पविकसित देशात उत्पनाची पातळी अल्प असते. मात्र, त्याचबरोबर उत्पन्न व संपत्तीच्या वाटणीत विषमता असते. आर्थिक विकासामुळे अधिकाधिक लोकांना उत्पन्नाच्या संधी मिळून उत्पन्नातील विषमता कमी होण्यास मदत होते.

**८) राहणीमानात सुधारणा :**

देशातील लोकांना चांगल्या प्रकारची राहणीमानाची पातळी मिळवून लोकांचे आर्थिक कल्याण होण्यासार्ट आर्थिक विकास महत्त्वाचा आहे. आर्थिक विकासामुळे देशातील एकूण उत्पादनात व दरडोई वास्तव उत्पादनात बाढ होते. त्यामुळे वस्तू व सेवांच्या उपलब्धतेत सुधारणा होऊन देशातील लोकांच्या आवश्यक गरजांची पूर्तता होण्यास मदत होते. तसेच वस्तू व सेवांचे अधिक उत्पादन होत असल्याने देशातील लोकांना वस्तू व सेवा निवडीची संधी मिळते. चांगला आहार, आरोग्य सुविधा, शिक्षण सुविधा वगैरेंच्या उपलब्धतेमुळ आयुर्मवदित व साक्षरतेत वाढ होऊन लोकांच्या जीवनमानाच्या पातळीत सुधारणा होते.

**९) आर्थिक स्वावलंबन :**

परकीय देशावरील अवलंबित्व कमी करून आर्थिक स्वावलंबन साध्य करण्यासाठी आर्थिक विकास महत्वाच असतो. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शेती, उद्योग व सेवा क्षेत्रातील उत्पादनात वाढ होते. देशात आयात होणाऱ्या वस्तूला पर्यायी वस्तूंचे उत्पादन देशात होऊन आयातीवरील अवलंबित्व कमी होते.

**१०) आर्थिक वृद्धी :**

आर्थिक वृद्धीसाठीच आर्थिक विकास घडून येणे आवश्यक असते. आर्थिक वृद्धी घडून येण्यासाठी देशात आर्थिक विकास घडून येणे आवश्यक असते. अल्पविकसित देशात वेगाने आर्थिक विकास घडून आल्यास त देशात आर्थिक वृद्धी घडून येण्यासाठी योग्य परिस्थिती निर्माण होते.